# विद्यापीठात आज कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आज, शनिवारी सकाळी ११ वाजता 'विद्यार्थी परिषद निवडणूक' विषयावर कार्यशाळा होत आहे. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमाचे उद्घाटन आनंद मापुस्कर यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत.

# विद्यापीठात आज कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने शनिवारी (ता.१५) सकाळी ११ वाजता 'विद्यार्थी परिषद निवडणूक' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे.

विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात होणाऱ्या या कार्यशाळेचे उद्‌घाटन आनंद मापुस्कर यांच्याहस्ते होणार आहे. अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे भूषविणार आहेत.

# रेशीम सल्लागार समिती सदस्यपदी डॉ. जाधव

कोल्हापूर टाइम्स टीम

महाराष्ट्र शासनातर्फे नुकत्याच स्थापन करण्यात आलेल्या रेशीम सल्लागार समितीवर येथील शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. ए. डी. जाधव यांची तज्ज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याचे वस्त्रोद्योग सचिव हे समितीचे अध्यक्ष राहणार असून नागपूरचे रेशीम संचालक सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

डॉ. जाधव रेशीमशास्त्र विषयाचे अध्यापन, संशोधन, प्रसार व प्रचार यासाठी मोलाचे योगदान देत आहेत. क्युबा या देशासाठीही ते रेशीम सल्लागार म्हणून काम पाहात आहेत. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन या समितीवर त्यांची निवड करण्यात आली आहे.

राज्यातील सर्वांगीण रेशीम विकासाच्या दृष्टीने धोरण तयार करणे, राज्यातील रेशीम विस्तार व विकासासाठी कर्नाटक, आंध्र प्रदेश व तमिळनाडू



इत्यादी राज्यांच्या धर्तीवर तुती रेशीम उद्योगाची आणि झारखंड, छत्तीसगड राज्यांच्या धर्तीवर टसर रेशीमसाठी विकास कार्यक्रमांचा कृती आराखडा तयार करणे, धोरण तसेच आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी कामकाजाची दिशा ठरविणे, राज्यात पैठणी, येवला इत्यादी पारंपरिक कौशल्यावर आधारित रेशीम उत्पादनाचा जागतिक पातळीवर प्रचार करून त्याला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी सेरी-टुरिझम प्रकल्प हाती घेण्यासाठी उपाययोजना सुचविणे आदी कामकाज समितीमार्फत करणे अपेक्षित आहे.गेल्या काही दिवसांपासून पश्चिम महाराष्ट्रात रेशीम उद्योगाकडे तरुण शेतकरी वळत आहेत. या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याबरोबरच हा शेतीव्यवसाय वाढविण्यासाठी सक्षम यंत्रणा तयार करण्यासाठी ही समिती उपयुक्त ठरेल.